ISSN 2249-894X Impact Factor : 3.1402 (UIF) Volume - 5 | Issue - 8 | May - 2016

Review Of Research





# अमरावती व यवतमाळ जिह्यातील आदिवासी नागरीकांना आर्थिक विकास योजनांचा लाभ घेताना येणाऱ्या विविध अडचणिंचा अभ्यास

प्रा. रूपेश कुऱ्हेकर
संशोधनकर्ता
एम.कॉम. एम.फिल., सहाय्यक प्राध्यपक ,
आबासाहेब पारवेकर महाविद्यालय, यवतमाळ.

## साराशं

आदिवासी हे भारतीय संस्कृतीचा अविभाज्य भाग आहेत आणि त्यांच्याकडे समृद्ध सांस्कृतिक वारसा आहे. अनेक भाषा आणि शारीरिक वैशिष्ट्यांमधील त्यांची सांस्कृतिक एकात्मता आगळी–वेगळी आहे. अनेक युगांमधून ती अबाधित राहिली आहे. भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी १९५२ मध्ये एका परिषदेत भाषण करताना सांगितले होते की, “जीवनयापन करण्याचा कोणता मार्ग उत्तम आहे याची मला खात्री नाही, आपला की आदिवासींचा, पण काही बाबतीत मला खात्री आहे, की आदिवासींचा मार्ग उत्तम आहे. त्यांच्या संस्कृतीकडून अनेक गोष्टी शिकता येतील.” आदिवासींची संस्कृती आणि मूल्ये योग्य तऱ्हेने समजून घेण्यासाठी हे शब्द अत्यंत योग्य आहेत. आपली सांस्कृतिक एकात्मता आणि अंतर्गत मूल्यांची जपणूक करण्यासाठी हे आदिवासी शांतपणे एकाकी राहण्याची सवय लावून घेतात. या सवयीचा अर्थ ‘तुटकपण’ किंवा ‘एकांतवास’ असा लावला जातो तो चुकीचा आहे. स्वाभिमान आणि विश्वास हे त्यांच्या संस्कृतीचे अविभाज्य घटक आहेत. आपली संस्कृती आणि मूल्ये याच्याशी तडजोड करायला आदिवासी

तयार नव्हते आणि राहणार नाहीत. आपल्या लोकांसोबतच राहून आपली अंतर्गत मूल्ये आणि सांस्कृतिक एकात्मता जपण्याच्या आदिवासींच्या इच्छेमागे बहूधा हे मुख्य कारण आहे. या इच्छेमागे त्यांच्या आजवरच्या जीवित्वाचा लक्षणीय लेखाजोखा आहे. वर्चस्वकारी संस्कृतिच्या रगाड्याात त्यांना समन्वित करण्यासाठी आजवर झालेले अनेक प्रयत्न त्यांनी अप्रत्यक्ष विरोधाने मोडून काढले आहेत कारण गुलामगिरी स्वीकारण्याची त्यांची इच्छा नाही.

## एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पः

१९८१ च्या जनगणनेनूसार भारताची लोकसंख्या ६८.५२ कोटी होती त्यापैकी ५.१६ कोटी (७.५३ टक्के) लोकसंख्या आदिवासींची होती. हे आदिवासी मुख्यतः जंगलात राहत असून यात १५० वेगवेगळया समुदायांचा समावेश होता. हे समुदाय १०५ वेगवेगळया भाषा, बोली व उप बोलींचा वापर करित होता. सामाजिक-आर्थिक विकास अवस्था, सांस्कृतिक पार्श्वभूमी व वारसा, गुणधर्म, मानसिकता इत्यादीप्रमाणे देखील या जमातींदरम्यान अंतर होते व देशातील लोकससंख्येत या जमाती किमान आर्थिकदृष्टया विकसित विभागात मोडत होत्या. आदिवासी विकासातील समस्यांकडे विशेष लक्ष पुरविण्याच्या उद्देशाने पाचव्या पंचवार्षीक (१९७४.७९) योजनेदरम्यान आदिवासी उप-योजनांचे साधन तयार करण्यात आले. या उद्देशाने पहिल्यांदाच १६ राज्य व २ केंद्रशासीत प्रदेशांकरिता स्वतंत्र आदिवासी उप-योजना तयार करण्यात आल्या. या योजनांतर्गत देशातील ६३ टक्के आदिवसी लोकसंख्या लाभान्वित करण्यात आली. कार्यान्वयनाच्या दृष्टिकोणातून आदिवासी उप-योजना १८० एकात्मिक विकास प्रकल्पात विभाजित करण्यात आल्या. या प्रकल्पा अंतर्गत खालील अर्थसहाय्याच्या योजना आहेत-

१) कन्यादान योजना.
२) आदिवासी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती.
३) दारिद्र्य रेषे खालील आदिवासी कुटूंबांना दुभत्या जनावरांचे वाटप.
४) आदिवासी महिलांकरिता अर्थसहाय्य बचतगटाची योजना.
५) सुवर्ण मोहोत्सवी आदिवासी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजना.
६) आदिवासी शेतकरी कुटूंबांना दारिद्र्यरेषेच्या वर आणण्याकरिता अर्थसहाय्य.
७) मत्स्यव्यवसाय योजना.
८) फलोत्पादन योजना.
९) मांसल कुक्कूट पक्षी पालन योजना.
१०)दुधाळ संकरित गाई-म्हशींचे वाटप.
११) शंभर टक्के अनुदान तत्वावर शेतीसाठी खत व बियाणे पुरवठा.
१२)मातृत्व अनुदान योजना.
१३)१०० टक्के अनुदान तत्वावर स्प्रेपंप पुरवठा योजना.
१४)जनश्री विमा योजना.
१५) केंद्रवर्ती अर्थ संकल्प योजना.
१६) स्वयंरोजगारासाठी कर्ज पुरवठा योजना.
१७) खावटी कर्ज योजना.
१८) शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाच्या योजना

## आदिवासी आर्थिक विकास योजनांचा लाभ घेताना आलेल्या अडचणींचा प्रकार

### सारणी क्रमांक १: अमरावती व यवतमाळ जिल्ह्यातील आदिवासी उत्तरदात्यांना आदिवासी आर्थिक विकास योजनांचा लाभ घेताना आलेल्या अडचणींच्या प्रकारासंबंधी माहिती

| आदिवासी आर्थिक विकास योजनांचा लाभ घेताना आलेल्या अडचणींचा प्रकार | अमरावती | | यवतमाळ | |
|---|---|---|---|---|
| | संख्या | टक्के | संख्या | टक्के |
| योजनांची माहिती नाही | २१७ | ५२.७ | २८९ | ६८.३ |
| कागदपत्रांची अपूर्तता | २१३ | ५१.७ | २५६ | ६०.५ |
| अमंलबजावणी अधिकाऱ्यांची उदासीनता | १३२ | ३२.० | ७८ | १८.४ |
| योजनेसाठी आवश्यक रक्कम भरण्यातील असमर्थता | १५६ | ३७.९ | २११ | ४९.९ |
| पात्रतेचा अभाव | ३२ | ७.८ | १९ | ४.५ |
| योजना लाभ मिळण्यातील कार्यालयीन दिरंगाई | २०७ | ५०.२ | १३७ | ३२.४ |
| फसवणूक | ८७ | २१.१ | ९६ | २२.७ |
| इतर | १४ | ३.४ | ३८ | ९.० |

उपरोक्त **सारणी क्रमांक १** मध्ये अमरावती व यवतमाळ जिल्ह्यातील आदिवासी उत्तरदात्यांना आदिवासी आर्थिक विकास योजनांचा लाभ घेताना आलेल्या अडचणींच्या प्रकारासंबंधी माहिती दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनूसार अमरावती जिल्ह्यातील ५२.७ टक्के आदिवासी उत्तरदात्यांना आर्थिक विकास योजनांचा लाभ घेताना योजनांची माहिती नसणे ही अडचण आली असून, ५१.७ टक्के आदिवासी उत्तरदात्यांना आर्थिक विकास योजनांचा लाभ घेताना कागदपत्रांची अपुर्तता ही अडचण आली असल्याचे निदर्शनास आले. त्याचप्रमाणे ५०.२ टक्के आदिवासी उत्तरदात्यांना आर्थिक विकास योजनांचा लाभ घेताना कार्यालयीन दिगराई ही अडचण आली तर आर्थिक विकास योजनांचा लाभ घेताना योजनेसाठी आवश्यक रक्कम भरण्यातील असमर्थता, अमंलबजावणी अधिकाऱ्यांची उदासीनता, फसवणूक, पात्रतेचा अभाव व इतर अडचणींचा अनुभव आलेल्या अमरावती जिल्ह्यातील आदिवासी उत्तरदात्यांची टक्केवारी ३७.९ टक्के, ३२.० टक्के, २१.१ टक्के, ७.८ टक्के व ३.४ टक्के होती.

तसेच यवतमाळ जिल्ह्यातील ६८.३ टक्के आदिवासी उत्तरदात्यांना आर्थिक विकास योजनांचा लाभ घेताना योजनांची माहिती नसणे ही अडचण आली असून, ६०.५ टक्के आदिवासी उत्तरदात्यांना आर्थिक विकास योजनांचा लाभ घेताना कागदपत्रांची अपुर्तता ही अडचण आली असल्याचे निदर्शनास आले. त्याचप्रमाणे ४९.९ टक्के आदिवासी उत्तरदात्यांना आर्थिक विकास योजनांचा लाभ घेताना योजनेसाठी आवश्यक रक्कम भरण्यातील असमर्थता ही अडचण आली तर आर्थिक विकास योजनांचा लाभ घेताना कार्यालयीन दिंगराई, फसवणूक, अंमलबजावणी अधिकाऱ्यांची उदासिनता, पात्रतेचा अभाव व इतर अडचणींचा अनुभव आलेल्या यवतमाळ जिल्ह्यातील आदिवासी उत्तरदात्यांची टक्केवारी ३२.४ टक्के, २२.७ टक्के, १८.४ टक्के, ४.५ टक्के व ९.० टक्के होती.

उपरोक्त परिणाम दर्शवितात की, अमरावती व यवतमाळ जिह्यातील आदिवासी नागरीकांना आर्थिक विकास योजनांचा लाभ घेताना विविध

अडचणिंचा जसे योजनांची माहिती नसणे, कागदपत्रांची अपूर्तता, अमंलबजावणी अधिकाऱ्यांची उदासीनता, योजनेसाठी आवश्यक रक्कम भरण्यातील असमर्थता, पात्रतेचा अभाव, योजना लाभ मिळण्यातील कार्यालयीन दिरंगाई, फसवणूक व इतर अडचणिंचा सामना करावा लागतो तथापी योजनांची माहिती नसणे, कागदपत्रांची अपूर्तता व योजनेसाठी आवश्यक रक्कम भरण्यातील असमर्थता ह्या ठळक समस्या आहेत.

## निष्कर्ष,

सारणी क्रमांक ५.३९ मधिल परिणाम दर्शवितात की, अमरावती व यवतमाळ जिह्यातील आदिवासी नागरीकांना आर्थिक विकास योजनांचा लाभ घेताना विविध अडचणिंचा जसे योजनांची माहिती नसणे, कागदपत्रांची अपूर्तता, अमंलबजावणी अधिकाऱ्यांची उदासीनता, योजनेसाठी आवश्यक रक्कम भरण्यातील असमर्थता, पात्रतेचा अभाव, योजना लाभ मिळण्यातील कार्यालयीन दिरंगाई, फसवणूक व इतर अडचणिंचा सामना करावा लागतो तथापी योजनांची माहिती नसणे, कागदपत्रांची अपूर्तता व योजनेसाठी आवश्यक रक्कम भरण्यातील असमर्थता ह्या ठळक समस्या आहेत.

## संदर्भ ग्रंथसूची


१) मानसशास्त्र परिभाषा कोश (१९९१) मुबंई, भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य.
२) डॉ. आगलावे प्रदीप संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे विद्या प्रकाशन,नागपूर १ जाने.२000
३) डॉ.भांडारकर पु.ल. सामाजिक संशोधन पद्धती महाराष्ट्र विद्यापीठ ग्रथनिर्मीत मंडळ,नागपुर. तृतीय आवृत्ती १९८७
४) डॉ.संत दु.का. संशोधन पद्धती,प्रक्रिया व अंतरंग पुणे विद्यार्थीगृह प्रकाशन पुणे द्वितीय आवृत्ती जुलै - १९८८
५) डॉ.नाडगोंडे गुरूनाथ सामाजिक संशोधन पद्धती फडके प्रकाशन कोल्हापूर द्वितीय आवृत्ती ऑक्टो.१९९९
६) डॉ. जरारे विजय एल. समाजिक शास्त्रीय संशोधन प्रणाली अद्वैत प्रकाशन,अकोला २२ ऑक्टो.२00४
७) प्रा. घाटोळे रा.ना. समाजशास्त्रीय संशोधन तत्वे आणि पद्धती मंगेश प्रकाशन, नागपूर पाचवी आवृत्ती १९९२
८) डॉ. बोरूडे रा.र. संशोधन पद्धतीशास्त्र पुणे विद्यार्थीगृह प्रकाशन सप्टें.२00५
९) गारे गोविंद, (२000) आदिवासी समस्या आणि बदलते संदर्भ, सुगावा प्रकाशन, पुणे,
१0) देवगावकर सौ. शैलजा व देवगावकर श. गो., जुलै (२00१), आदिवासी विश्व, आंनद प्रकाशन, नागपूर,
११) Bryld, E. (2001). Increasing Participation in Democratic Institutions Through Decentralization: Empowering Women and Scheduled Castes and Tribes Through Panchayat Raj in Rural India, Democratization, pp. 149-172.
१२) Deininger, K and Liu, Y. (2013). Welfare and Poverty Impacts of Mahatma Gandhi National Rural Employment Guarantee Scheme: Evidence from Andhra Pradesh, India, IFPRI Discussion Paper 01289, Available at SSRN: https://ssrn.com/abstract=2343178.
१३) Rabi, R and Satyam, K. (2014). Tribal development in Bihar: A critical analysis special reference to Purnia district, Indian Journal, 3(1), pp. 112-123.

१४) Mahapatra, A.K., Tewari, D. D and Baboo, B. (2015). Displacement, Deprivation and Development: The Impact of Relocation on Income and Livelihood of Tribes in Similipal Tiger and Biosphere Reserve, India, Environmental Management, 56(2), pp. 420-432.

१५) Sahu, D., Nair, S., Singh, L., Gulati, B.K and Pandey, A. (2015). Levels, trends & predictors of infant & child mortality among Scheduled Tribes in rural India, Indian J Med Res, 141(5), pp. 709–719.

१६) Devindrappa, K and Shinde, R. (2014). Socio-Economic Conditions of Scheduled Tribes in Karnataka, Indian Streams Research Journal, 4(8), Available at SSRN: https://ssrn.com/abstract=2498353

१७) Guru, M.C., Rajendra, B., Devanoor, G and Rajeev, K. (2016). Constitutional Provisions for Inclusive Development of SCs, STs and OBCs in India: An Assessment, Journal of Multidisciplinary Approach and Studies, 3(1), pp. 143-154.